पोलीस आयुक्त , छत्रपती संभाजीनगर यांचे कार्यालय,
मिलकॉर्नर, डॉ.बाबासाहेब आंबेडकर रोड, छ.संभाजीनगर- ४३१ ००१.
दुरध्वनी क्रमांक ०२४०-२२४०५९१,फॅक्स क्र.०२४०-२२४०५९६
ई मेल :- ps.splbranch.abad@mahapolice.gov.in

---

गोपनिय जा.क्र.विशा-३/आदेश/छ. संभाजीनगर/२०२४ 3792छ. संभाजीनगर,दि.12/ ०९ /२०२४

**भारतीय नागरीक सुरक्षा संहीता २०२३ चे कलम १६३ प्रमाणे प्रतिबंधक आदेश.**

**आदेश :-**

ज्या अर्थी भारतीय विमानपतन प्राधिकरण , छत्रपती संभाजीनगर यांनी माझ्या असे निदर्शनास आणुन देण्यात आले आहे की, पोलीस आयुक्त छत्रपती संभाजीनगर कार्यक्षेत्रात विमानतळच्या आजुबाजुच्या परीसरात अनेक फार्म हाउस, मंगल कार्यालय येथील विवाह सोहळा आणि विविध सामाजिक, धार्मीक कार्यक्रम सण उत्सव मध्ये लेझर लाईट्स/ बीम लाईट्स वापरतात.लेझर लाईट्स/बीम लाईट्स मुळे विमानाच्या ऑपरेशन मध्ये गंभीर समस्या निर्माण होउ शकतात पायलेटच्या दुष्टीत व्यत्यय आणतात. आणि लॅडींग व टेकअप करण्यापुर्वी पायलेटचे लक्ष विचलीत होउन एखाद्या वेळीस गंभीर हवाई वाहतुक दुर्घटना होउ शकते त्यामुळे विमानातील प्रवाशांची सुरक्षा धोक्यात येवु शकते तसेच छत्रपती संभाजीनगर पोलीस आयुक्तालयाचे कार्यक्षेत्रात विविध सामाजिक, धार्मीक कार्यक्रम तसेच सण उत्सव कार्यक्रमाच्या वेळेस आकाशामध्ये प्रखर लेझर लाईट्स/ बीम लाईट्सचा वापर करण्यात येते.

माझी अशी खात्री पटली आहे की अशा प्रखर बीम लाईट व लेझर बीम लाईट मुळे वैमानिकाचे डोळे दिपुन दुर्घटना होण्याची शक्यता आहे.

भारतीय नागरिक सुरक्षा संहीता २०२३ चे कलम १६३ अन्वये पोलीस आयुक्त यांना विशेष कार्यकारी दंडाधिकारी म्हणुन कलम १६३ चे विशेष अधिकार प्रदान केलेले आहेत.

त्याअर्थी **मी प्रविण पवार पोलीस आयुक्त छत्रपती संभाजीनगर** मला भारतीय नागरीक सुरक्षा संहीता २०२३ चे कलम १६३ प्रमाणे प्राप्त झालेल्या अधिकारान्वये असा आदेश देतो की

छत्रपती संभाजीनगर विमानतळच्या साधारणपणे १५ कि.मी. अंतराच्या वायुक्षेत्र (Air Field ) परीघामध्ये (Radius) व छत्रपती संभाजीनगर पोलीस आयुक्तालयाचे कार्यक्षेत्रात नमुद कृत्यावर प्रतिबंध करण्यात येत आहे.

कोणत्याही व्यक्तीने किंवा कार्यक्रमाचे आयोजकांनी लेझर लाईट्स/ बीम लाईट्स आकाशात सोडु नये **सदरील आदेश दिनांक 12/०९/२०२४ पासुन दिनांक 11/११/२०२४ पावेतो ६० दिवसा करीता अंमलात राहील.**

सदरच्या सुधारीत आदेशाचे उल्लंघन करणारी व्यक्ती भारतीय न्याय संहीता कलम २२३ प्रमाणे शिक्षेस पात्र राहील.सदरचा आदेश मी, माझ्या सहीनिशी आज दि.12/०९/२०२४ रोजी दिला आहे

सर्व पोलीस उप आयुक्त, सर्व सहाय्यक पोलीस आयुक्त सर्व पो.स्टे. प्रभारी अधिकारी, यांना सुचित करण्यात येते की, सदरचा प्रतिबंधक आदेश सर्व संबंधितांना वैयक्तिक रित्या बजावणे शक्य नसल्याने व त्यांना अवगत करणे आवश्यक असल्याने आपण सदर प्रतिबंधात्मक आदेशास प्रसिध्दी

माध्यमे. सर्व पोलीस ठाणे. पोलीस अधिकारी कार्यालय. छावणी मंडळ. महानगर पालिका. मध्यवर्ती बसस्थानक. रेल्वेस्टेशन. मुख्य बाजारपेठा. सार्वजनिक वाचनालये इत्यादी महत्वाच्या ठिकाणच्या सुचना फलकावर चिटकावुन प्रसिध्दी द्यावी. त्याचप्रमाणे पोलीस अधिकारी यांनी महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम १६३ प्रमाणे प्रसिध्दीची कार्यवाही करावी.

सदर आदेशाची अंमलबजावणी करण्यासाठी आम्ही आमचे अधिनस्थ परिमंडळाचे सर्व पोलीस उप-आयुक्त. विभागाचे सहाय्यक पोलीस आयुक्त व पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी यांना प्राधिकृत करीत आहोत.

**( प्रविण पवार )** भा.पो.से.
पोलीस आयुक्त,छत्रपती संभाजीनगर

**महत्वाची टिप- ( गॅझेट प्रसिध्दी करीता)-** १) सहायक पोलीस आयुक्त ( प्रशासन ) छ. संभाजीनगर
२) सहायक संचालक , (मुख्य व्यवस्थापक) शासकिय मुद्रणालय , रेल्वेस्टेशन जवळ छत्रपती संभाजीनगर
३) जिल्हा माहीती अधिकारी छत्रपती संभाजीनगर

प्रति :-

१)सर्व पोलीस उप-आयुक्त, छत्रपती संभाजीनगर
२)सर्व सहाय्यक पोलीस आयुक्त, छत्रपती संभाजीनगर
३)सर्व पो.स्टे./शाखा प्रभारी अधिकारी,नियंत्रण कक्ष,छत्रपती संभाजीनगर

प्रतिलिपी :-

१)विभागीय आयुक्त,छत्रपती संभाजीनगर
२)जिल्हाधिकारी, छत्रपती संभाजीनगर
३)म.न.पा.आयुक्त, छत्रपती संभाजीनगर
४)उपायुक्त,राज्य गुप्तवार्ता विभाग, छत्रपती संभाजीनगर
५)केंद्र संचालक,आकाशवाणी, छत्रपती संभाजीनगर
६)सोशल मिडीया,गुन्हे शाखा, छत्रपती संभाजीनगर
७)शासकीय मुद्रणालय, छत्रपती संभाजीनगर
८) भारतीय विमानपतन प्राधिकरण , छत्रपती संभाजीनगर